drppl Dharavi Redevelopment Project

# DHARAVI COMPILED MEDIA REPORT
## 02 Mar, 2025 - 03 Mar, 2025

### Total Mention 12

| Print | Financial | Mainline | Regional | Periodical |
|---|---|---|---|---|
| 4 | N/A | N/A | 4 | N/A |

| Tv | Business | English | Hindi | Regional |
|---|---|---|---|---|
| N/A | N/A | N/A | N/A | N/A |

| Online |
|---|
| 8 |

## Print

| No | Newspaper | Headline | Edition | Pg |
|---|---|---|---|---|
| 1. | Lokmat | Don't be misled by the partial statistics of Dharavikars | Mumbai | 4 |
| 2. | Sakal | DRP Notice to Survey Rejectors | Mumbai | 3 |
| 3. | Mumbai Tarun Bharat | Just do a little study of the documents for the Nashdai, Dharavikars | Mumbai | 3 |
| 4. | Navbharat | Dharavi development is Asia's biggest scam: Varsha | Pune | 7 |

Lokmat • 03 Mar • Dharavi

## Don't be misled by the partial statistics of Dharavikars

| 4 • PG | 129 • Sqcm | 129001 • AVE | 604.7K • Cir | Bottom Left | Hello Mumbai |
|---|---|---|---|---|---|

Mumbai

# ‘धारावीकरांची अर्धवट आकडेवारीने दिशाभूल नको’

## खासदार वर्षा गायकवाड यांना शेवाळे यांचे खुले पत्र

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** धारावी पुनर्विकास प्रकल्पाबाबत मोजकीच आकडेवारी मांडून आणि अर्धसत्य विधान करून धारावीकरांची दिशाभूल करू नका, असे खुले पत्र माजी. खा. राहुल शेवाळे यांनी खासदार वर्षा गायकवाड यांना लिहिले आहे. या पुनर्विकासात प्रत्येकाला घर मिळणार, अशी ग्वाही प्रकल्पाचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीनिवासन यांनी दिलेली असताना त्यांनी पारदर्शी पद्धतीने घेतलेल्या भूमिकेबाबत तुम्हाला आक्षेप असण्याचे कारण काय? असा सवाल शेवाळे यांनी या पत्रात उपस्थित केला आहे.

तुम्ही आजवर धारावीकरांना केवळ आश्वासनं दिली. त्या आश्वासनांची पूर्तता करण्यापासून तुम्हाला कोणी रोखलं होतं का , असा सवालही त्यांनी केला. शासनाने मंजूर केलेल्या या प्रकल्पात ‘नवभारत मेगा डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड’ला १४ कोटी चौरस फूट विक्रीयोग्य क्षेत्र उभे करण्याचा अधिकार दिला असल्याची बाब तुम्ही जनतेला रंगवून सांगितली.

### १० कोटी

चौरस फुटांचे बांधकाम एनएमडीपीएल कडून करण्यात येणार

भारतातील या सगळ्यात मोठ्या पुनर्वसन प्रकल्पात पुनर्वसनासाठी सुमारे १० कोटी चौरस फुटांचे बांधकाम एनएमडीपीएलकडून करण्यात येणार आहे, हे सत्य तुम्ही का लपवून ठेवता? असेही ते म्हणाले.

Former MP Rahul Shewale accused MP Varsha Gaikwad of misleading Dharavi residents with selective data. He questioned objections to CEO Srinivasan’s assurances and transparency. He asked why she hid the fact that NMDCPL would build 10 crore sq. ft. for rehabilitation while 14 crore sq. ft. was for saleable development.

Sakal • 03 Mar • Dharavi

## DRP Notice to Survey Rejectors

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3 • PG | 99 • Sqcm | 65187 • AVE | 352.42K • Cir | Middle Right |

Mumbai



# सर्व्हे नाकारणाऱ्यांना डीआरपीची नोटीस

मुंबई, ता. २ : धारावीच्या पुनर्विकासाच्या पारश्वभूमीवर धारावी पुनर्विकास प्रकल्पाकडून (डीआरपी) झोपड्यांचे सर्वेक्षण सुरू असून आतापर्यंत ८४ हजार झोपड्यांचे नंबरिंग, तर ५३ हजार झोपड्यांचा घरोघर जाऊन सर्व्हे करण्यात आला आहे. मात्र, काही ठिकाणी सर्व्हेला विरोध होत आहे. तेथील ठिकाणच्या सर्व्हेला सहकार्य मिळावे, यासाठी डीआरपीकडून प्रयत्न केले जात आहेत. तरीही विरोध कमी होत नसून सर्व्हे नाकारणाऱ्या जवळपास १०० हून अधिक रहिवाशांना डीआरपीने नोटीस दिली आहे. होणाऱ्या नुकसानाला संबंधित स्वतः जबाबदार राहतील, असे धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्यावतीने स्पष्ट केले आहे.

धारावीच्या बहुतांश भागात सर्व्हेचे काम झाले असून महिनाभरात पूर्ण होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर धारावीचा मास्टर प्लान लवकरच येणार आहे. मात्र, धारावीतील राजीव गांधी नगरसह परिसरात काही झोपड्यांचा सर्व्हे होऊ शकलेला नाही. दोन-तीन वेळा सर्व्हे करणारे डीआरपीचे कर्मचारी जाऊनही प्रतिसाद मिळत नसल्याची माहिती डीआरपीचे मुख्य कार्यकारी अधिकारी एस. व्ही. आर. श्रीनिवासन यांनी दिली. झोपड्यांचा सर्व्हे करण्यास विरोध होत असलेल्या ठिकाणचा सर्व्हेच होत नसल्याने त्यांची आवश्यक कागदपत्र कशी मिळणार, पात्रता कशी निश्चित केली जाणार हे प्रश्न आहेत.

## १ लाख ४० हजारांवर झोपड्या

सध्या धारावीतील ५३ हजार झोपड्यांचा सर्व्हे पूर्ण झाला असून ८४ हजार झोपड्यांची नंबरिंग झाले आहे. त्यामुळे संपूर्ण धारावीचा विचार करता एकूण झोपड्यांची संख्या १ लाख ४० हजारापर्यंत जाऊ शकणार असल्याची माहिती डीआरपीच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. त्याचबरोबर धारावीतील सुमारे ७० धार्मिक स्थळांचे सर्वेक्षण झाले असून एकूण संख्या सुमारे ३०० पर्यंत जाईल असा अंदाज आहे.

The Dharavi Redevelopment Project (DRP) is conducting a survey of slums, numbering 84,000 structures so far, with 53,000 homes surveyed door-to-door. However, some areas are resisting. DRP has issued notices to over 100 residents refusing the survey, stating they will be responsible for any consequences.

Mumbai Tarun Bharat • 03 Mar • Dharavi

## Just do a little study of the documents for the Nashdai, Dharavikars

| 3 • PG | 130 • Sqcm | 16254 • AVE | 17.73K • Cir | Middle Right |
|---|---|---|---|---|

Mumbai

# वर्षाताई, धारावीकरांसाठी कागदपत्रांचा थोडा अभ्यास कराच

## दहा कोटी चौ. फूट क्षेत्रफळाचे बांधकाम हे सत्य का लपवता? राहुल शेवाळे यांचे पत्र

**मुंबई, दि. २ : विशेष प्रतिनिधी**

''भारतातील सगळ्यांत मोठ्या पुनर्वसन प्रकल्पात स्थानिकांच्या पुनर्वसनासाठी सुमारे दहा कोटी चौ. फुटांचे बांधकाम 'एनएमडीपीएल'कडून करण्यात येणार आहे. हे सत्य तुम्ही का लपवून ठेवता?'' असा प्रश्न करीत माजी खा. राहुल शेवाळे यांनी खा. वर्षा गायकवाड यांना खुले पत्र लिहिले आहे.

राहुल शेवाळे पत्रात लिहितात की, ''धारावी पुनर्विकास या शासकीय प्रकल्पाबाबत मोजकीच आकडेवारी जनतेसमोर मांडून, पुन्हा एकदा आपण राजकीय चलाखीचे दर्शन घडवले. आपल्या अर्धसत्य (खरे तर असत्य) विधानांमुळे धारावीकरांच्या मनात निर्माण होऊ शकणारा संभ्रम दूर करण्यासाठी आणि जनतेला सत्य सांगण्यासाठी हा लेखनप्रपंच! 'धारावी पुनर्विकास प्रकल्पा'चे मुख्य कार्यकारी अधिकारी एस. व्ही. आर. श्रीनिवास यांनी सांगितले आहे की, या पुनर्विकासात प्रत्येकाला घर मिळणार. त्यांनी प्रकल्पाबाबत इतक्या पारदर्शी पद्धतीने थेट भूमिका घेतली, तर त्यात तुम्हाला आक्षेप असण्याचे कारण काय? तुम्ही आजवर धारावीकरांना केवळ पोकळ आश्वासने दिली. त्या आश्वासनांची पूर्तता करण्यापासून तुम्हाला कोणी रोखले होते का? तुम्हाला खरेच धारावीचा विकास हवा आहे की इथल्या लोकांनी केवळ 'व्होट बँक' बनून पिढ्यानपिढ्या आहे तसेच राहायचे?'' असा प्रश्न राहुल शेवाळे यांनी उपस्थित केला.

### वास्तवाकडे का डोळेझाक करत आहात?

पुढे ते म्हणतात की, ''शासनाने मंजूर केलेल्या या प्रकल्पात 'नवभारत मेगा डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड' (एनएमडीपीएल)ला १४ कोटी चौ. फूट विक्रियोग्य क्षेत्र उभे करण्याचा अधिकार दिला असल्याची बाब आपण जनतेला रंगवून सांगितली. मात्र, भारतातील या सगळ्यांत मोठ्या पुनर्वसन प्रकल्पात स्थानिकांच्या पुनर्वसनासाठी सुमारे दहा कोटी चौ. फुटांचे बांधकाम 'एनएमडीपीएल'कडून करण्यात येणार आहे, हे सत्य तुम्ही का लपवून ठेवता? या विक्रीयोग्य क्षेत्रफळातून लाभ मिळविण्यासाठी सुमारे १५ ते २० वर्षांचा कालावधी जावा लागेल, या वास्तवाकडे डोळेझाक करत आहात,'' असे त्यांनी म्हटले आहे.



**जमिनी सरकारच्याच मालकीच्या राहतील**

''या सगळ्यात मोठ्या पुनर्विकास प्रकल्पातून विकासकाला १.५ लाख कोटी रुपयांचा फायदा होणार असल्याची आवई तुम्ही उठवली. पण, हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी विकासकाला सुमारे तीन लाख कोटी रुपयांची गुंतवणूक करावी लागणार, याबाबत तुमच्या तोंडून एक अक्षरही निघत नाही. ज्या जमिनींबाबत तुम्ही गैरसमज पसरवत आहात, त्यातील एकही जमीन विकासकाला दिली जाणार नाही. त्या सगळ्या जमिनी राज्य सरकारच्याच मालकीच्या आहेत आणि राहतील,'' असेही शेवाळे यांनी सांगितले.

### पारदर्शकतेकडे कानाडोळा का करता?

रेल्वे लाईन, मोठ्या प्रमाणात असलेले वीजवाहक टॉवर्स आणि जवळच असलेले विमानतळ अशा अनेक बाबींमुळे धारावीचा पुनर्विकास हा शासनासाठी आव्हानात्मक मानला जातो. यासाठीच ४० टक्के हस्तांतरणीय विकासहक्का(टीडीआर)च्या धोरणाचा समावेश करण्यात आला. वास्तविक, 'झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पा'तून कमीत कमी २० टक्के 'टीडीआर' खरेदी करण्याचे धोरण पूर्वीपासून अस्तित्वात आहे. तुम्ही प्रकल्पाला विरोध करताना जे आकांडतांडव करता, तेव्हा या पारदर्शकतेकडे मात्र कानाडोळा करता,'' असेही राहुल शेवाळे यांनी म्हटले आहे.

**रहिवाशांना आत्मसन्मानाने जगण्याची एक संधी**

- पत्राच्या शेवटी खासदार शेवाळे लिहितात, ''सत्य सगळ्यांसमोर स्पष्ट आहे. धारावी पुनर्विकासातून रहिवाशांना केवळ नवे घर मिळणार नसून त्यांना आत्मसन्मानाने जगण्याची एक संधी मिळेल.
- धारावीकरांची पिळवणूक थांबेल. त्यांची राजकीय गुलामगिरीतून मुक्तता होईल. पोकळ आश्वासने देऊन ज्यांना अनेक दशकांपासून केवळ 'व्होट बँक' म्हणून वापरले, ते धारावीकर आता जागे होतील आणि त्यांच्या दयनीय भूतकाळाबाबत तुम्हाला नक्कीच जाब विचारतील. तेव्हा त्यांना काय उत्तर द्याल ताई?'' असा सवालही शेवाळे यांनी उपस्थित केला आहे.

Rahul Shewale, in an open letter to Varsha Gaikwad, questions the transparency of Dharavi's redevelopment project. He criticizes political misleading statements and urges clarity about the rights of locals. Shewale highlights NMDPL's responsibility and the project's massive investment, stressing the need for honesty and self-esteem for residents.

Navbharat • 03 Mar • Dharavi

# Dharavi development is Asia's biggest scam: Varsha

| 7 • PG | 63 • Sqcm | 30825 • AVE | 85K • Cir | Middle Center |
|---|---|---|---|---|

Pune



# धारावी विकास एशिया का सबसे बड़ा घोटाला : वर्षा

■ मुंबई, (सं.) धारावी पुनर्वास परियोजना को लेकर कांग्रेस पार्टी ने महायुति व केंद्र सरकार पर हमला बोला है. पार्टी सांसद व मुंबई की अध्यक्ष वर्षा गायकवाड ने धारावी विकास को एशिया का सबसे बड़ा रियल इस्टेट घोटाला करार दिया है. उन्होंने आरोप लगाया है कि धारावी की 14 करोड़ वर्ग फीट की जमीन अदानी को देकर मुंबई वासियों के साथ विश्वासघात किया जा रहा है.वर्षा ने आरोप लगाया कि इससे अदाणी को 1.5 लाख करोड़ रुपये का मुनाफा होगा जबकि धारावी वासियों के साथ अन्याय होगा. लगभग 70 हजार से भी कम धारावी वासियों का पुनर्वास वहीं पर होगा और बाकियों को मुंबई से बाहर भेज दिया जाएगा. यह एशिया का सबसे बड़ा रियल इस्टेट घोटाला है. यह अदाणी का वैभव विकास और धारावी का विनाश है. लेकिन मोदी सरकार चुप है. यह लड़ाई धारावी वासियों और मुंबई के अस्तित्व की है. कांग्रेस पार्टी यह संघर्ष जारी रखेगी.

Congress MP Varsha Gaikwad has criticized the Dharavi redevelopment project, calling it Asia's biggest real estate scam. She alleges that the project will benefit Adani, with a profit of Rs 1.5 lakh crore, while betraying Mumbai's residents. Gaikwad vows to continue fighting for the rights of Dharavi's people.

## Online Coverage

| No | Portal Name | Headline (Incorporated with URL) | Reach |
|---|---|---|---|
| 1. | Dailyhunt | Dharavi Redevelopment: 5 key highlights of the master plan and the ongoing surve... | 18.6M |
| 2. | Saamana | धारावीच्या सहापट जमीन अदानीच्या घशात! सरकार लाडक्या मित्रावर मेहेरबान... निम्मे सर... | 1.2M |
| 3. | HT Syndication | Dharavi Redevelopment: 5 key highlights of the master plan and the ongoing surve... | 119.8K |
| 4. | HT Syndication | Dharavi Redevelopment: 5 key highlights of the master plan and the ongoing surve... | 119.8K |
| 5. | OFFICE NEWZ | Dharavi Redevelopment: 5 key highlights of the master plan and the ongoing surve... | 87.7K |
| 6. | Bricksnwall | Dharavi Redevelopment: Five salient features of the ongoing study and the master... | N/A |
| 7. | Creative Bharat | Dharavi Redevelopment: 5 key highlights of the master plan and the ongoing surve... | N/A |
| 8. | The Realty Today | Dharavi Redevelopment: Master Plan Nears Completion, ₹ Lakh Crore Investment Ex... | N/A |